राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

४१२ ब, तिसरा मजला, तंत्र शिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/एमआयएस/२०२५/ 1563

दिनांक 14 MAY 2025

प्रति,

प्राचार्य/उपसचिव
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

विषय- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट अ व ब च्या अधिकारी /अध्यापकांनी नियतकालीक बदल्या २०२५ करिता माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) मध्ये प्रशासकीय व विनंती बदलीसाठीच्या ठिकाणांचे पसंतीक्रम नोंदविण्याबाबत...

संदर्भ- तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्र.४अ/आस्था/नियतकालीक बदल्या/२०२५/२७७
दिनांक १३/०५/२०२५

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करुन ते आपल्या करावे. सदर परिपत्रकातील नमूद सर्व मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने , आपल्या आस्थापनेवरील गट अ व ब च्या अधिकारी यांना MIS प्रणालीमधील बदली पसंती मोडयुल मध्ये प्रशासकीय / विनंती बदलीसाठी पसंतीची ठिकाणे नोंद करणेबाबत सुचित करण्यात यावे. सदर नोंदी करतांना मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील. तसेच सदर सुविधा ही दिनांक १९/०५/२०२५ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे नियोजित वेळेतच सदर कार्यवाही पूर्ण करणे बंधनकारक राहील. तरी त्याप्रमाणे संस्थास्तरावर योग्य त्या सुचना देण्यात याव्यात. (सोबत संदर्भिय परिपत्रकाची प्रत जोडलेली आहे.)

सोबत-वरीलप्रमाणे

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक सहपत्रांसह या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०४/४२४/४३४
ई-मेल- desk4@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http//www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : ४अ/आस्था/नियतकालिक बदल्या/२०२५/२८७ दिनांक : 13 MAY 2025

विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट-अ व ब च्या अधिकारी/अध्यापकांनी नियतकालिक बदल्या २०२५ करिता माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) मध्ये प्रशासकीय व विनंती बदलीसाठीच्या ठिकाणांचे पसंतीक्रम नोंदविण्याबाबत ......

संदर्भ : ०१. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक ई-३०३२४९, दि.०७/०३/२०२४
०२. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक ४अ/आस्था-२/MIS/२०२५/१२८, दि.११/०२/२०२५
०३. संचालनालयाचे पत्र क्रमांक ४अ/आस्था-२/MIS/२०२५/१४४, दि.२१/०२/२०२५

सन २०२४ मधील नियतकालिक बदल्यांच्या अनुषंगाने शासकीय पदवी/पदविका संस्थातील अध्यापक तसेच अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्यांबाबत निर्गमित शासन आदेश, नियतवयोमानानुसार, स्वेच्छा सेवानिवृत्ती, राजीनामा, निधन किंवा इतर कारणास्तव काही अध्यापकांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या असल्यास त्यानुषंगाने संबंधित आस्थापना व संस्थातील पदांची तसेच अध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांची माहिती MIS प्रणालीमध्ये अद्ययावत करण्याच्या सुचना संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकान्वये यापुर्वीच देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार शैक्षणिक संस्थामधील / कार्यालयातील गट अ व ब संवर्गातील पदे व कार्यरत अधिकारी यांची माहिती अद्ययावत आहे किंवा नाही याबाबतची शहानिशा कार्यालय प्रमुखांनी करावी, जेणेकरून या माहितीच्या आधारे जे काही धोरणत्मक व सेवाविषयक बाबींचे निर्णय होतील ते बिनचूक होतील. MIS प्रणालीमधील माहितीनुसार घेण्यात आलेला निर्णय चुकीचा झाला तर त्यास संबंधित कार्यालय प्रमुखांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरीता सन २००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२१, दिनांक १२/०५/२००६ मधील तरतूदीनुसार प्रत्येक वर्षी नियतकालिक बदल्यांची कार्यवाही करण्यात येते. या संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये व शासकीय संस्थेतील गट अ व गट ब संवर्गातील अधिकारी / अध्यापकांच्या सन २०२५ मधील नियतकालीक बदल्यांची कार्यवाही MIS प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे करण्याचे नियोजित आहे. यास्तव खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन MIS प्रणालीमधील बदली पसंती मॉड्युल (Transfer Option Module) मध्ये प्रशासकीय / विनंती बदलीसाठी पसंतीचे ठिकाणांची नोंद करावी.

आस्था-१
१४।५।२५
M।४।५

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
14 MAY 2025
आवक क्र. 3067

I. प्रशासकीय बदलीसाठी संबंधीत अधिका-यांना वैयक्तिक पसंतीची ३ ठिकाणे (आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रातील बदलीपात्र अधिका-यास ४ पसंती ठिकाणे) व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) मध्ये भरणे बंधनकारक असलेबाबत संस्था प्रमुखांनी सुचित करावे.

II. जे अधिकारी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे MIS प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने भरणार नाहीत किंवा विहित केलेल्या पसंतीच्या ठिकाणांपेक्षा कमी ठिकाणे भरतील त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने पसंती दिलेल्या ठिकाणांशिवाय अन्यत्र करण्यांत येईल यांची जाणीव संस्था प्रमूखांनी संबंधित अधिका-यांना करून द्यावी

III. जे अध्यापक विनंती बदलीसाठी इच्छुक आहेत अशा अध्यापकांनी विंनती बदलीबाबतची ऑनलाईन माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच ज्या अध्यापकांनी त्यांचे जवळचे नातेवाईकांचे आजारपण व त्यांचे स्वत:चे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल अशा अध्यापकांची विनंती बदली अर्जासोबत शासकीय व निमशासकीय रुग्णालयाचे अधीक्षक / अधिष्ठाता / जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र अथवा त्यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे.

IV. विनंती बदलीसाठी अर्ज व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) द्वारे ऑनलाईन सादर करावेत, ऑफलाईन अर्ज, थेट शासनास व संचालनालयास सादर केलेले अर्ज विचारात न घेता नस्तिबध्द करण्यात येतील, याची जाणीव संबंधित अधिका-यांना संस्था प्रमुखांनी करून द्यावी.

V. नियतकालीक बदल्यांचा पुर्वानुभवानुसार संस्थाप्रमुखांनी शिफारशीसह सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने बदल्याबाबत निर्णय घेतल्यानंतर बदली केलेल्या काही अध्यापकांची बदली रद्द करण्याबाबत संस्थाप्रमुखांकडूनच विनंती करण्यांत येते. म्हणून याबाबत आपणांस सूचित करण्यांत येते की, संदर्भीय बदल्यांच्या कायद्याचे अवलोकन करून बदली पात्र अध्यापकांची बदली करावयाची नसल्यास त्यांचे ठोस समर्थन आवश्यक त्या कागदपत्रासहीत देऊन तशी शिफारस व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) मध्ये करण्यांत यावी. याबाबत बदली झाल्यानंतर संस्था प्रमुखांची कोणतीही शिफारस आल्यास विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

VI. जे अध्यापक बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर प्रचलित शासन नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येईल व याबाबतची वार्षिक गोपनिय अहवालात नोंद घेण्यात येईल ही बाब आपल्या कार्यालयातील अधिकारी, तसेच अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थेतील अध्यापकांच्या निदर्शनास आणावी.

VII. जे अध्यापक इतर आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत त्या सर्व अध्यापकांची माहिती मुळ आस्थापनेवरून ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावी.

VIII. संस्था प्रमूख व विभागीय सहसंचालकांनी बदल्यांबाबत खालील प्रकरणी व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या जागेत त्यांचे स्पष्ट मत/अभिप्राय नमूद करणे बंधनकारक आहे.

- बदलीपात्र असलेल्या अध्यापकांच्या प्रशासकीय कारणास्तव नियतकालीक बदल्यांबाबत स्पष्ट मत/ अभिप्राय नमूद करावे.
- विनंती बदलीच्या अनुषंगाने स्पष्ट मत/ अभिप्राय नमूद करावे.

- ज्या अध्यापकांच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांचा शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकुल आहे अशा अध्यापकांसंदर्भात त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे ? याबाबत स्पष्ट अभिप्राय नमूद करून (आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करण्यात यावीत.
- संदर्भीय बदल्यांच्या कायद्याचे अवलोकन करून बदली पात्र अध्यापकांची बदली करावयाची नसल्यास त्यांचे ठोस समर्थन आवश्यक त्या कागदपत्रे अपलोड करून तशी शिफारस नमूद करावी.
- बदलीपात्र अध्यापकांचे पाल्य शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये १० वी किंवा १२ वीत शिकत असल्यास तसे स्पष्टपणे नमूद करणे
- जे बदलीपात्र अध्यापक नजिकच्या कालावधीत डिसेंबर २०२५ पूर्वी सेवानिवृत्त होत आहेत अशा अध्यापकांबाबत स्पष्ट अभिप्राय नमूद करण्यात यावेत.
- दिनांक १४/०७/२०२१ च्या संवर्ग विभाजनाच्या शासन निर्णयानुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेल्या आहे अशा अध्यापकांबाबत अभिप्राय.

नियतकालिक बदल्यांसाठी पसंतीचे ठिकाणांची नोंदणी MIS प्रणालीवर करण्याची सुविधा **दिनांक १९/०५/२०२५ पर्यंत** उपलब्ध करुन देण्यात येत आहे. संबंधित अधिकारी/अध्यापकांनी पसंतीच्या ठिकाणांची नोंदणी विहित मुदतीत MIS प्रणालीवर करावी. तद्नंतर सदर सुविधा एमआयएस प्रणालीवर बंद करण्यात येईल. विहित मुदतीत पसंतीच्या ठिकाणांची माहिती न भरल्यास संबंधित अधिकारी/अध्यापकांना बदलीचे पसंतीक्रम देण्यात स्वारस्य नाही असे समजून प्रशासकीय सोयीनुसार नियतकालिक बदल्यांसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत, मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर

प्रत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी :-

१) सहसंचालक, सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर, अमरावती नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपले स्तरावरुन आपले विभागाच्या कार्यक्षेत्रात येणा-या शासकीय संस्थाना अग्रेषित करुन विहित कालमर्यादेत माहिती MIS प्रणालीद्वारे भरण्यास सुचित करावे. तसेच नियतकालिक बदली संदर्भात त्यांचे स्तरावरील आवश्यक कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
३) प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, सर्व शासकीय तंत्र निकेतने व तत्सम संस्था (सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचेमार्फत)
४) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालये (सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचेमार्फत)
५) कार्यासन क्रमांक ३, ४, मुख्य कार्यालय, मुंबई
६) कार्यासन क्रमांक ४अ, निवड नस्तीस